ISSN: 2348-1390

# NEW MAN

## INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

VOL. 5 ISSUE 9 SEPTEMBER 2018

A PEER REVIEWED AND INDEXED E-JOURNAL

IMPACT FACTOR: 4.321 (IIJIF)

*Editor-in-Chief*

**Dr. Kalyan Gangarde**

*Editor*

**Dr. Sadhna Agrawal**

**NEW MAN PUBLICATION**

PARBHANI (MAHARASHTRA)

Contact: +91 942007997[illegible] [illegible]0721393 nmpublication@[illegible]

Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

# CONTENTS

1. Diasporic Element In Bharathi Mukherjee's Wife | Mrs. K. Kavitha & Prof. M. Amalraj
2. Marital Relationship In Mohan Rakesh's *Halfway House* : A Subversion Of The Social Ethos | Dr Binu Anitha Joseph
3. Characters Of Arundhati Roy's Novels | Unnikrishnanatiyodi PM
4. Poverty Reduction Of Self Help Group In Financial Inclusion | Varma Kirankumari
5. Mahatma Gandhi: An Idol For The Writers In Indian Literature In English |

   Mr. Mundhe Ramakant D.
6. Women Empowerment: A Universal Urgency | Nadeem Nisar
7. Comparative Study Of the Effect Of Chemical Fertilizer and Organic Fertilizer : A Case Study Of South 24 Parganas, India | Mandira Shaw
8. Scheduled Castes And Restrictions | Kashide Yadav M.& Dr. Chavan Yashwant B.
9. भारत में शिक्षा का अधिकार | संतोष कुमार मिश्र
10. भारत पाक संबंध : भारतीय प्रतिरक्षा के विशेष संधर्भ में | डॉ. विष्णू कांत शर्मा
11. महाराष्ट्रातील डाळींब उत्पादन, विपणन व निर्यातीचा अभ्यास | पठाण दस्तगीर रमजान
12. आदिवासी समाजाच्या विकासात आदिवासी कार्यकारी सहकारी संस्थांची भूमिका | प्रा. गजानन अमृता भुरके
13. अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या आर्थिक व सामाजिक समस्या आणि उपाय योजना | प्रा. सौ. व्ही.भूतडा
14. भारतीय समाजातील नक्षलवादी चळवळीचा उदय व विकास | यादव परमेश्वर दत्तात्रय
15. नासिरा शर्मा के 'शाल्मली' उपन्यासों में स्त्री संघर्ष | के. विजयकुमारी
16. सांगली जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादन आणि विपणनाचा अभ्यास | पंदरकर बाबासाहेब रघुनाथ

ID. No.
PU/AN/A/
58/1999
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

16.

# सांगली जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादन आणि विपणनाचा अभ्यास

संशोधक
पंदरकर बाबासाहेब रघुनाथ

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यावस्थेचा कणा आहे. नियोजनकाळात देशात औद्योगिक क्षेत्राची प्रगती झाली असली तरी शेती क्षेत्राचे महत्व कमी झाले नाही. शेती क्षेत्र हे रोजगार उपलब्ध करून देणारे क्षेत्र असल्याने देशाच्या दृष्टीने महत्वाचे क्षेत्र आहे. शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी असला तरी इतर देशाच्या तुलनेत तो मोठा आहे.

द्राक्ष हे फळ नगदी पिकांच्या फळांत मोडणारे असुन जगातील फळांच्या उत्पादनापैकी प्रतिवर्षी सुमारे ५.९ दशलक्ष टनापेक्षा जास्त उत्पादन द्राक्षापासुन मिळते. जगातील खाद्यपदार्थांमध्ये द्राक्षांचा क्रमांक आठवा आहे. या फळांची बहुतांश निपज व्हिटीस व्हिनीफेरा या प्रकारातून होते. द्राक्षाचे उत्पादन विशेषतः भुमध्य सामुद्रिक हवामानाच्या प्रदेशात ज्या ठिकाणी दिर्घकालीन शुष्क उन्हाळे व बेताची थंडी असलेले हिवाळे असतात अशा ठिकाणी आढळून येतात.

द्राक्षांची लागवड वेगवेगळ्या ठिकणी केली जात असून त्या मानाने भारतात द्राक्षाची लागवड कमी असून देखील भारतात दर्जेदार द्राक्षाचे उत्पादन होते. भारतात फलोत्पादनामध्ये द्राक्ष फळ महत्वाचे फळ आहे.

**विषयाची निवड**

भारतीय अर्थव्यावस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था असुन या अर्थव्यवस्थेत चहा, कॉफी, तंबाखू, ऊस, ताग, कापुस या सारखी नगदी पिके घेतली जातात. या पिकांपासुन देशाला परकीय चलन मिळू लागले आहे. या पिकांच्या अर्थशास्त्रात पिकांपासुन मिळणारे उत्पादन त्यासाठी करावा लागणारा खर्च व निव्वळ नफा कसा काढावयाचा यासाठी संशोधन होणे गरजेचे आहे. या पिकांच्या अर्थशास्त्रात उत्पादन खर्च काढण्याच्या वेगवेगळ्या पध्दती आहेत. नगदी पिकांचा विचार केल्यास काही नगदी पिकांच्या खर्चाचे स्वरुप सुरूवातीला जास्त व नंतर कमी असे नसते म्हणुन या पिकांचा अभ्यास वेगळ्या पध्दतीने करावा लागतो. कारण अशा पिकांमध्ये केलेली गुंतवणुक फार मोठी नसते. शिवाय एक ते दीड वर्षात उत्पादन मिळते त्यामुळे गुंतवलेला पैसा जलद मिळतो. परंतु फळांच्या उत्पादन खर्चाचा अभ्यास वेगळ्या पध्दतीने करण्याची गरज आहे. कारण फळांच्या बाबतीत एकदा लागवड केली की अनेक वर्ष त्याला फळे येतात. फळाची लागवड करतांना सुरवातीला त्यापासुन प्रतिफल फार कमी मिळते किंवा शुन्यसुध्दा असु शकते. नंतर खर्च कमी होत असतो व प्रतिफल वाढत असते म्हणुन नगदी पिकांच्या अर्थशास्त्रापेक्षा फळ पिकांच्या अर्थशास्त्राचा अभ्यास वेगळ्या पध्दतीने केल्यास इतर फळापेक्षा द्राक्ष उत्पादनासाठी सुरवातीच्या काळात मोठ्याप्रमाणात गुंतवणुक करावी लागते. म्हणून सांगली जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादन व विपणन व्यवस्थापनाचा अभ्यास हा विषय अभ्यासासाठी निवडलेला होता.

**अभ्यासाचे महत्व**

द्राक्ष लागवडीमुळे देशाच्या आर्थिक विकासाला व जडणघडणीला हातभार लागलेला आहे. द्राक्ष लागवडीमुळे मजुरांना दिर्घकाळ काम मिळते देशाला परकीय चलन मिळते. आरोग्य दृष्टया हे फळ महत्व पूर्ण आहे. द्राक्ष शेती ही शास्त्रीय पध्दतीने केली जाते. या करिता तंत्रज्ञानाची आयात करावी लागत नाही. इतर पिकांच्या मानाने हे पिक अधिक पैसे मिळवून देणारे असले तरी लागवड खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. सांगली जिल्ह्यात द्राक्षेचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जात असल्यामुळे प्रस्तुत विषयाला महत्व प्राप्त होते.

**उदिष्टये**

द्राक्ष लागवडीचा इतिहास अभ्यासणे.

द्राक्षाच्या विविध जातीचा अभ्यास करणे.

द्राक्षाच्या उत्पादन व विपणनाचा अभ्यास करणे

**अभ्यास पध्दती**

प्रस्तुत विषयासाठी प्राथमिक व दुय्यम साधनसामग्रीचा वापर करून माहिती संगलित केल्या गेली.



Savitribai College of Arts * ID. No. 93 PU/AN/A/ 58/1999 * Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar



PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

**अभ्यास मर्यादा**

प्रस्तुत अभ्यासासाठी सांगली जिल्हा निवडून दहा वर्षाचा कालखंड समोर ठेवून अभ्यास केल्या गेला.

**द्राक्ष लागवडीचा इतिहास**

द्राक्षाचे मुळ स्थान रशियातील अरमेनिय जिल्हा आहे. भारतात द्राक्षाचा प्रसार इराण आणि अफगाणिस्तानातुन झाला. द्राक्षाचे वेल मुळचा पश्चिम आशियातील केस्पियन सामुद्रीक प्रदेशातील वा कॉकेशस पर्वतातील असावा. द्राक्षाच्या वंशातील एकुन पन्नास ते साठ जाती पैकी भारतात फक्त पाच आढळतात. इजिप्तमध्ये ही द्राक्षवेल फार प्राचीन काळापासून सहाहजार वर्षापुर्वीपासुन पिकवली जात आहे. एलिरियन, ग्रीक व रोमण लोकांनी तिच्या विकासासाठी परिश्रम घेतले आहेत. त्याच्यापासून बनविलेले मद्य त्यांना परिचित होते. इतिहास पूर्व काळात दक्षिण व मध्य युरोपात हा वेल रानटी अवस्थेत वाढत होता. असे आडोल्फ एंगलर या जर्मन वनस्पती वैद्यानिकांनी दाखविला आहे. भारतात इ.स. १३०० च्या सुमारात इराण व अफगाणिस्तान येथुन द्राक्षवेल आला. भारतीय संस्कृती वाङमयात द्राक्षाचे उल्लेख पुढील ग्रंथात आले आहेत. पाणीनीचा अष्ठाध्यायी ग्रंथ,कौटिल्य अर्थशास्त्र, महाभारत, चरक संहिता, सुश्रुत संहिता, ब्रहत संहिता, मदन विनोद निघटु, निघटु ग्रंथ या वरुन द्राक्षवेल भारतात आला असून त्याची लागवड व वापर होत होता.

**द्राक्षाच्या विविध जाती**

द्राक्ष ही एक वेल वर्गातील वनस्पती आहे . याच्या पिवळी द्राक्ष व काळी द्राक्ष या दोन जाती आहेत. या व्यतिरिक्त काही जाती पुढील प्रमाणे सांगता येतील. मलो, शरद, थॉमसन, माणिकचमन, सोनाक्का, सुपर सोनाक्का, आनाबेशाही, गुलाबी, बंगलोर पर्पल, काळी साहेबी, फकडी, तास ए गणेश, किशमिश चोनी, फ्लेम सिडलेस इत्यादी जाती आहेत.

**द्राक्षाच्या उत्पादन व विपणनाचा अभ्यास**

**सांगली जिल्ह्यातील द्राक्ष लागवडीखालील क्षेत्राचे तालुका निहाय वर्गीकरण (हेक्टर)**

| अ.क्र | तालुके | शेतकरी संख्या | लागवड क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | मिरज | ३९१२ | ४७२३ | २१.४४ |
| २ | पालूस | १६२१ | १९४० | ८.४९ |
| ३ | तासगाव | ७५७१ | ९९८५ | ४३.७४ |
| ४ | खानापूर | १६४१ | १९५० | ८.५४ |
| ५ | कवठे महाकाळ | १२६१ | १६३० | ७.१४ |
| ६ | जत | १०२९ | १२०६ | ५.२८ |
| ७ | कडेगाव | ७८२ | ८५० | ३.७२ |
| ८ | वाळवा | ३२९ | ४१८ | १.८१ |
| ९ | आटपाडी | ९७ | १२२ | ०.५३ |
| | एकूण | १८३४३ | २२८२५ | १००.०० |

संदर्भ : जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय, सांगली

अभ्यासासाठी निवडलेल्या पाच तालूक्यात १००० हेक्टरमागे एक गाव याप्रमाणे २१ गावांची निवड केली आहे. ही गावे निवडतांना द्राक्षांखालील जास्तीत जास्त क्षेत्र या निकषावर आधार घेतला आहे. या गावातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची एकूण धारण क्षेत्राच्या आधारे निवड करून धारण क्षेत्राप्रमाणे लहान (०.०१ ते ०२ हेक्टर), मध्यम शेतकरी (२.०१ ते ४ हेक्टर) , मोठे शेतकरी (४ हेक्टरच्या पुढे) अशा गटात विभागणी केली आहे.

एफ ए ओच्या आकड्याप्रमाणे सन २०१३ मध्ये संपुर्ण जगामध्ये ७१,५५,१८७ हेक्टर क्षेत्रावरती ७,७१,८१,१२२ मेट्रीक टन द्राक्षाचे उत्पादन होते. द्राक्ष उत्पादनामध्ये स्पेन , फ्रान्स, चीन, इटली, टर्की, अमेरिका हे देश अग्रेसर आहेत. जगातले ५० टक्के क्षेत्र व उत्पादन या देशांमध्ये आहे. सन २०१२-१३ मध्ये भारतामध्ये १,१७,६०० हेक्टर क्षेत्रामध्ये २४,८३,००० मेट्रीक टन द्राक्षाचे उत्पादन झाले. ते जगातील क्षेत्राच्या व उत्पादनाच्या अनुक्रमे १.६५ टक्के व ३.२२ टक्के होते. गेल्या काही वर्षामध्ये भारतातील द्राक्षाचे क्षेत्र व उत्पादन या दोन्ही मध्ये सातत्याने वाढ होत आहे.

Savitribai College of Arts * ID. No. PU/AN/A/ 58/1999 94 Tal. Shrigonda
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

भारतातील एकूण १,१८,७४० हेक्टर क्षेत्रापैकी ९०,००० हेक्टर (७५.८० टक्के) क्षेत्र महाराष्ट्रात आहे . या क्षेत्रात महाराष्ट्र २१,६०,००० मट्रीक टन द्राक्ष उत्पादन करतो. जे भारताच्या एकूण उत्पादनाच्या ८३.२४ टक्के आहे . म्हणजेच महाराष्ट्रात इतर राज्याच्या तुलनेत प्रति एकरी जास्त उत्पादन काढले जाते. महाराष्ट्रातील बहुतांशी ६१.९ टक्के द्राक्षाचे नाशिक जिल्ह्यामध्ये उत्पादन होते. त्या पाठोपाठ २९.९८ टक्के द्राक्षे सांगली जिल्ह्यात होतात या नंतर सोलापूर जिल्ह्यात ३.९ टक्के व उस्मानाबाद जिल्ह्यात २.६९ टक्के द्राक्ष उत्पादन होते. उरलेली ३.१५ टक्के द्राक्षे अहमदनगर, पुणे, लातूर, जळगाव, सातारा, औरंगाबाद, धुळे, बुलढाणा व जालना जिल्ह्यात होतात.

देशा अतर्गत बाजारपेठे बरोबरच जागतिक बाजार पेठेत द्राक्ष विक्रिस चांगला वाव आहे. भारतीय द्राक्षाची निर्यात प्रामुख्याने नेदरलॅन्ड, इग्लड, बाग्लादेश, बेल्झीयम, सौदी अरेबिया, नार्वे, नेपाळ, जर्मनी, श्रीलंका इत्यादी देशात जास्त प्रमाणात होते.

### निष्कर्ष

वरिल अभ्यासा अंती असे स्पष्ट होते की भारतातील शेतकरी घेत असलेल्या नगदी पीकाऐवजी फळबागामधून निघणाऱ्या उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारत आहे. विशेषत: सांगली जिल्हा महाराष्ट्रात द्राक्ष उत्पादनाच्या बाबतीत क्रमांक २ वर असून येथील द्राक्ष प्रादेशिकच नव्हे तर आंतराष्ट्रीय बाजार पेठेत मोठ्याप्रमाणात निर्यात होत असून त्यामुळे शेतकऱ्यांना परकीय चलन प्राप्त होते. एकंदरीतच द्राक्ष उत्पादन शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी महत्व पूर्ण व्यवसाय आहे.

### संदर्भसूची


- गांधी एस.आर- भारतातील द्राक्ष संस्कृती, १९६०
- आय. सी. ए. आर- भारतातील फळ संस्कृती. १९६३
- जी. सिंग - पंजाबमधील द्राक्ष लागवडीचे अर्थशास्त्र १९८३
- गो. आ. कोप्पीकर - द्राक्षांची बाग, १९६६
- प्र. पु. देशमुख - भारतातील फळझाडांची बाग, १९५०
- पाटील अ.व्य आणि कारळे ए.आर - महाराष्ट्रातील फळ झाडे,१९८२
- भी. गो. भुजबळ - द्राक्ष बाग, १९८४


### वेबसाईट


- कृषी विभाग
- महाराष्ट्र शासन
- केंद्र शासनाचा कृषी व सहकार विभाग
- ॲग्रोवन


□□□

Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/ 58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar